महाराष्ट्र शासन
सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय पुणे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, स.नं.१०४/१०५, विश्रांतवाडी रोड, पोलिस स्टेशन समोर, येरवडा पुणे
दुरध्वनी व फॅक्स क्र.०२० २९७०६६११ E-mail:-acswopune@gmail.com

---

क्र/भासाशि/सआसकपुणे/महाडीबीटी/Against Cap/२०२३-२४/6346 दि. .११.२०२३ 05-12-23

प्रति,
प्राचार्य,
अनुदानित / कायम विनाअनुदानित
व्यावसायिक / बिगर व्यावसायिक
कनिष्ठ / वरिष्ठ महाविद्यालये (पुणे जिल्हा).

विषय: भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठी अनुसुचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना सामाईक प्रवेश परिक्षाव्दारे (कॅप) प्रवेश घेतल्या असल्याबाबतच्या अटींची सक्ती न करणेबाबत.

संदर्भ: १. मा. आयुक्त,समाज कल्याण, म.रा पुणे यांचेकडिल पत्र क्र.सकआ/शिक्षण/कॅप राऊंड/सक्ती/२०१५-१६/४६२ दि.०६.०२.२०१६
२. इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे शासनपत्र शिष्यवृत्ती-२०१७/प्र.क्र.१३/शिक्षण दि.०१.०६.२०२०
३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडिल शासन निर्णय दि.३१.०३.२०१६

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून, संदर्भ क्र.१ अन्वये केंद्र पुरस्कृत अनुसूचित जातीच्या मुलामुलींसाठी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विद्यार्थ्याने कोणत्याही अभ्यासक्रमास प्रवेश घेताना तो सामाईक प्रवेश परिक्षाद्वारे (कॅप) घेतला असला पाहिजे अशी सक्ती करण्यात येवू नये असे कळविण्यात आले आहे. तसेच संदर्भ क. २ चे शासनपत्राद्वारे ज्या विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना देखील भारत सरकार मट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अदा करण्यासाठी सामाईक प्रवेश परीक्षेची (कॅप) सक्ती करण्यात येऊ नये असे कळविले आहे.

त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृती (Post Matric Scholarship) योजनेसाठी अनुसूचित जाती, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग प्रवर्गातील तंत्रशिक्षणाशी निगडीत पदविका, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी या योजनेचा लाभ ज्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेश घेतला आहे, अशाच विद्यार्थ्यांना लागू राहील. याशिवय सदर प्रवेश पक्रिया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर (Against Cap) प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना (उत्पन्न मर्यादा २.५ लक्ष) तसेच विमुक्त जाती भटक्या जगाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना (उत्पन्न मर्यादा १.५ लक्ष) देखील सदर योजनेचा लाभ घेता येईल.

सदर बाब केवळ भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (Post Matric Scholarship) साठी लागू आहे. संदर्भ क्र.३ मधील शासन निर्णयानुसार शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना (Freeship) साठी व्यवसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणा-या

विद्यार्थ्यांना केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेश घेतला असल्याचे CAP Allotment Letter सादर करणे बंधनकारक आहे याची कृपया नोंद घ्यावी.

(विशाल लोंढे)
सहायक आयुक्त,
समाज कल्याण, पुणे

प्रत माहितीस्तव सविनय सादर

१. मा. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, म.रा. पुणे
२. मा.संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, संचालनालय म.रा पुणे
३. मा. सहआयुक्त (शिक्षण), समाज कल्याण आयुक्तालय, म.रा. पुणे
४. मा. प्रादेशिक उपआयुक्त, समाज कल्याण, पुणे विभाग, पुणे
५. मा. प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक) विभाग पुणे.